दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २२२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१२ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

कोकणातील प्रवाशांसाठी अ‍ॅलर्ट, मध्य रेल्वेचा २७ तासांचा ब्लॉक

सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मशीद बंदर रेल्वे मार्गावरील जुना पूल तोडण्याचे काम १९ व २० नोव्हेंबर रोजी हाती घेणार आहे. यासाठी मध्य रेल्वेकडून ब्लॉक' घेतला जाणार आहे. मध्य रेल्वेच्या या ब्लॉकचा सीएसएमटीकडे येणाऱ्या कोकण मार्गावरील १२ गाड्यांवर परिणाम होणार आहे. याशिवाय सलग दोन दिवस गाड्या सुटण्याच्या व प्रवास संपण्याच्या स्थानकातही बदल होणार आहे.

१२०५२ कमांकाच्या मडगाव-मुंबई सीएसएमटी जनशताब्दी एक्स्प्रेसचा १९ आणि २० रोजीचा प्रवास दादर स्थानकातच संपणार आहे. २२१२० कमांकाच्या मडगाव-मुंबई सीएसएमटी तेजस एक्स्प्रेसचाही दादर स्थानकातच प्रवास संपेल. १९ नोव्हेंबर रोजी सुटणारी १०१०४ कमांकाच्या मडगाव-सीएसएमटी मांडवी एक्स्प्रेसचा प्रवास पनवेल स्थानकात संपणार आहे. याचदिवशी सुटणारी १०११२ कमांकाची मडगाव-मुंबई कोकणकन्या एक्स्प्रेसही मडगावहून मुंबईला येताना पनवेल स्थानकापर्यंतच धावेल.

माणगांवजवळ बसला भीषण अपघात ; पुण्यातील १५ जण जखमी



दै.रायगड नगरी । माणगाव

पुण्यातील बसचा माणगावजवळ भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. ही बस १५ ते २० फूट खोल दरीत कोसळली. ज्यात १५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. माणगाव रस्त्यावरील घरोशी वाडी येथे हा अपघात झाला आहे.

सहलीसाठी आलेली बस घरोशी वाडीतील दरीत कोसळली. या घटनेत १५ विद्यार्थी जखमी झाले असून यातील दोघांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना पुढील उपचारांसाठी आता मुंबईला हलवण्यात आले आहे. तर इतर जखमींना उपचारांसाठी पाचाड ग्रामीण आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले आहेत.

रायगडच्या रस्त्यावर असताना हा अपघात झाला. या अपघातामागील नेमकं कारण अद्याप समोर आलं नाही. दरम्यान पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तात्काळ तपास सुरु केला आहे.

अलिबाग तहसीलदार दळवी लाचलुचपत खात्याच्या जाळ्यात

नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून कारवाई

दै.रायगड नगरी । अलिबाग

अलिबाग तहसीलदार मीनल दळवी याना लाच घेताना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले आहे.

तहसीलदार मीनल दळवी यांनी तक्रारदार यांच्याकडे काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती. मात्र तडजोड अंती २ लाख स्वीकारण्याचे तहसीलदार मीनल दळवी यांनी मान्य केले होते.



त्यासाठी त्यांनी तक्रारदार यांना गोंधळपाडा येथील निवासस्थानी पैसे घेवून बोलविले होते. त्याच दरम्यान २ लाखाची लाच घेताना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ अटक केली.

कारवाई दरम्यान तहसीलदार मीनल दळवी यांना उच्च रक्तदाबाचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. ही कारवाई नवी मुंबई लाचलुचपत विभागाच्या पोलीस अधिक्षक ज्योती देशमुख, पोलीस निरीक्षक शिवराज बेंद्रे यांच्या पथकाने सदरची कारवाई केली.

श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी गावातील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार ; ६ जणांवर गुन्हा दाखल

दै.रायगड नगरी । श्रीवर्धन

श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी गावामध्ये एक परप्रांतीय कुटुंब राहत होते. यामधील एका अल्पवयीन मुलीवरती लैंगिक अत्याचार होण्याची घटना घडली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सदर पीडित मुलीचे कुटुंब वाळवटी येथील एका चाळीमध्ये राहत होते. याच चाळीमध्ये राहणाऱ्या एका स्त्रीने सदर मुलीला तुला कामासाठी बाहेरगावी घेऊन जाते, अशी फूस लावून श्रीवर्धन या ठिकाणाहून माणगाव या ठिकाणी घेऊन गेली. सदर स्त्रीने तिला माणगाव येथे आपल्या बहिणीच्या घरी पाच सहा दिवस ठेवून घेतले. सदर मुलगी २४ ऑक्टोबर रोजी वाळवटी गावातून बेपत्ता झाली होती. याबाबत मुलीच्या आई वडिलांनी दिनांक ३० ऑक्टोबर रोजी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात मुलगी हरवल्याची तक्रार दिली होती. या प्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी मनुष्य मिसिंग रजिस्टर १४४/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. दरम्यानच्या काळामध्ये सदर पीडित मुलीच्या आई-वडिलांनी नालासोपारा येथे राहणाऱ्या आपल्या भावाच्या घरी देखील जाऊन चौकशी केली होती. परंतु पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केल्यानंतर एका सीसीटीव्ही फुटेज मध्ये सदरची मुलगी एका रिक्षामध्ये बसून कुठेतरी गेल्याचे दिसून आले. यानंतर पोलिसांनी सदर रिक्षावाल्याला ताब्यात घेऊन चौकशी केली.

रिक्षावाल्याने अगोदर उडवा उडवीची उत्तरे दिली, परंतु नंतर सदर पीडित मुलगी व एका स्त्रीला आपण माणगाव येथे सोडल्याचे कबूल केले. यानंतर पोलिसांनी माणगाव येथे जाऊन चौकशी केली असता वाळवटी येथील पीडित मुलीच्या शेजारी राहणारी स्त्री व माणगाव येथे राहणारी तिची बहीण या दोघींनी सदर मुलीला नालासोपारा येथे नेऊन आपल्या छोट्या भावाजवळ जबरदस्ती लग्न लावल्याचे निष्पन्न झाले. परंतु सदरची मुलगी अल्पवयीन असल्याने पोलिसांनी चार महिला व दोन पुरुष आरोपींवरती गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा व बालविवाह प्रतिबंधक कायदा या अन्वये गुन्हा दाखल केलेला असून पोलिसांनी सदर आरोपींना अटक

◄◄ .../२

पेणनजीक संशयास्पद आढळून आलेल्या जिलेटीन कांड्या सदृश्य वस्तू निघाली डमी बॉम्ब

सात तासांच्या प्रयत्नानंतर संशयास्पद बॉम्ब निकामी

दै.रायगड नगरी । पेण

मुंबई-गोवा महामार्गावरील पेणनजीक भोगावती पुलाच्याखाली संशयास्पद आढळून आलेल्या जिलेटीन कांड्यासारखी दिसणारी ती वस्तू ही डमी बॉम्ब असल्याचे निष्पन्न झालं असून सुमारे सात तासांच्या प्रयत्नानंतर संशयास्पद बॉम्ब निकामी करण्यात आला.

मुंबई - गोवा हायवेवरील पेणनजीक भोगावती पुलाच्याखाली संशयास्पद आढळून आलेली वस्तू ही डमी बॉम्ब असल्याचे निष्पन्न झालं आहे. सुमारे सात तासांच्या अथक प्रयत्नानंतर संशयास्पद बॉम्ब निकामी करण्यात आला. गुरुवारी १० नोव्हेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास जिलेटन कांड्या सदृश्य वस्तू सापडल्या होत्या. दरम्यान, नवी मुंबई आणि रायगडच्या बॉम्ब शोधक पथकाच्या मदतीनं हा बॉम्ब निकामी करण्यात यश मिळालं आहे.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथे आणि उरण तालुक्यात संशयित बोट सापल्याने गेल्या महिन्यातच खळबळ उडाली होती. आता पुन्हा एकदा रायगडच्या पेणमध्ये संशयास्पद वस्तू आढळल्याने खळबळ उडाली आहे. मुंबई - गोवा हायवेवरील पेणनजीक संशयास्पद वस्तू आढळली होती. भोगावती नदीच्या पुलाच्या खालच्या बाजूला १० ते १२ जिलेटीन सदृश्य कांड्या सापडल्याची प्राथमिक माहिती समोर आली होती. काल सायंकाळी भोगावती नदीपात्रात पाय धुण्यासाठी गेलेल्या तरुणाला पाण्यामध्ये संशयास्पद वस्तू दिसून आली. या घटनेची माहिती त्याने तात्काळ पेण पोलिसांना देताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली होती. त्याच बरोबर रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, उपविभागीय पोलीस अधिकारी शुक्ला, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, वडखळ पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर, सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, नायब तहसीलदार कालेकर, खालापूर, रोहा, पोयनाड, रसायनी आदी ठिकाणचे पोलीस अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन रात्र भर तळ ठोकून होते. याचबरोबर नवी मुंबई आणि रायगड येथील बॉम्ब शोधक पथकालाही पाचारण करण्यात आले होते. सुरक्षा यंत्रणा अलर्ट होऊन मुंबई-गोवा हायवेवरची दोन्ही बाजूची वाहतूक रात्रौ १० वाजता पासून पूर्णपणे बंद करण्यात आली होती.

अखेर सात तासांच्या अथक प्रयत्नानंतर सदर संशयास्पद आढळून आलेल्या जिलेटीन कांड्या सदृश्य वस्तू ही डमी बॉम्ब असल्याचे निष्पन्न झालं आहे. त्यामध्ये वायर, पाईप आणि घड्याळ आहे. त्यामुळे धोकादायक किंवा स्फोटक नसल्याचे स्पष्ट झाले आहे. केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी मुंबईवर दहशतवादी हल्ल्याचा अलर्ट जारी केला असतानाच मात्र ती वस्तू कुणी व कोणत्या उद्देशाने ठेवली याचा सखोल तपास करणे गरजेचे आहे.

हर हर महादेव सिनेमासंदर्भातील वाद, जितेंद्र आव्हाड यांना अटक

दै.रायगड नगरी । ठाणे

हर हर महादेव या मराठी चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीची माहिती दाखवली आहे, असा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सोमवारी काही कार्यकर्त्यांना सोबत घेऊन रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विवियाना मॉल येथील शो बंद पडला होता. यावेळी चित्रपट पाहण्यासाठी आलेल्या एका दर्शकाने चित्रपटाचे पैसे परत मागितले, तसेच कोण जितेंद्र आवड असा सवाल केल्याने, संतप्त झालेल्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी त्या दर्शकाला मारहाण केली होती. यानंतर मंगळवारी ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात जितेंद्र आव्हाडांसह १०० कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. यानंतर आज आव्हाडांना वर्तकनगर पोलिसांनी अटक केली आहे.

यासंदर्भात स्वतः आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एका पाठोपाठ एक असे तीन ट्विट केले आहेत, यात त्यांनी लिहिले आहे, आज दुपारी साधारण १ वाजता मला वर्तकनगर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निकम यांचा फोन आला आणि नोटीस घेण्यासाठी मी माणूस पाठवतो नाहीतर तुम्ही पोलीस स्टेशनला या असे ते म्हणाले. मी मुंबईला जायला निघालो होतो. मी म्हटलं कि, मी पोलीस स्टेशनला येतो आणि नंतर मी मुंबईला जातो.

पुढील ट्विटमध्ये आव्हाड म्हणाले, मी पोलीस स्टेशनला गेलो असताना त्यांनी मला गप्पांमध्ये गुंतवून ठेवलं. त्यानंतर डीसीपी राठोड हे पोलीस स्टेशनला आले.

त्यांच्या डोळ्यांत आणि चेहऱ्यावरती अस्वस्थपणा दिसत होता. हतबलता दिसत होती. ते आदराने म्हणाले कि, मी काही करु शकत नाही. वरुन आदेश आले आहेत. तुम्हांला अटक करावी लागेल.

पनवेलमध्ये भरणार योजनांचा महामेळावा

दै.रायगड नगरी । पनवेल

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधी सेवा समिती आणि पनवेल बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी पनवेलच्या वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. या महामेळाव्याचे बाबत माध्यमांना अवगत करण्यासाठी जिल्हा न्यायाधीश- १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल जयराज वडणे यांनी पत्रकार परिषदेस संबोधित केले. यावेळी पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष एड. मनोज भुजबळ उपस्थित होते.

जयराज वडणे यावेळी म्हणाले की,नागरिकांना लाभदायी ठरणाऱ्या १८ योजनांचे स्टॉल्स उभारण्यात आलेले असून,३१ ऑक्टोबर पासून हे अभियान सुरू झाले आहे.१३ नोव्हेंबर रोजी या अभियानाची सांगत आहोत असून यावेळी प्रातिनिधीक स्वरूपामध्ये लाभार्थींना वाटप केले जाणार आहे. सदरच्या कार्यक्रमासाठी मुख्य जिल्हा न्यायाधीश,अलिबाग येथून सावंत मॅडम, जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष एड. मनोज भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. नागरिकांनी या योजनांच्या महामेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी वडणे यांनी केले. तर यावेळी मनोज भुजबळ यांनी विधी सेवा समिती, पनवेल करत असलेल्या विविध उपक्रमाबाबत माध्यमांना अवगत केले.

अधिकारी तथा उप विभागीय दंडाधिकारी
पनवेल
AL OFFICER & SUB DIVISIONAL MAGISTRATE

यावेळी बोलताना अ‍ॅड.मनोज भुजबळ म्हणाले की, पनवेल विधी सेवा समितीच्या वतीने सर्वांना न्याय मागण्याचा अधिकार प्राप्त व्हावा या उदात्त हेतूने तळोजा कारागृहात जाऊन तब्बल २८७५ कैद्यांची एका प्रश्नावली द्वारे मुलाखती घेऊन त्यांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.

तर जयराज वडणे म्हणाले की, पनवेल विधी सेवा समितीने आदिवासी बांधवांच्या २५ प्रमुख व्यक्तींना कायदेविषयक मार्गदर्शन केले, तसेच त्यांच्या न्याय हक्कांचे बाबत त्यांना जागृत केले व त्यांच्या साठी विशेषत्वाने असलेल्या कायद्यांची त्यांना जाणीव करून दिली. मला खात्री आहे की हे २५ आदिवासी बांधव किमान अडीच हजार आदिवासींपर्यंत हे ज्ञान पोहोचवून त्यांच्या अधिकारांची त्यांना जाणीव करून देतील.

खा. गजानन किर्तीकर शिंदे गटात

दै.रायगड नगरी । मुंबई

बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची शपत घेतल्यानंतर शिवसेनेचे १२ खासदार शिंदे गटात गेले आहेत. त्यानंतर, राज्यातील विविध जिल्ह्यात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या. तर, गेल्या काही दिवसांपासून उत्तर पश्चिम मुंबई लोकसभा मतदार संघाचे खासदार गजानन कीर्तिकर हे शिंदे गटात सामील होण्याची चर्चा रंगली होती. अखेर किर्तीकर यांचा शिंदे गटात प्रवेश झाला. त्यामुळे, शिंदे गटातील खासदारांची संख्या आता १३ वर पोहोचली आहे. शिवसेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी गळाभेट घेत त्यांचे पक्षात स्वागत केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या निवासस्थानी भेट घेण्यासाठी गजानन किर्तीकर आले होते. त्यानंतर, मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर येथे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत त्यांनी जाहीर प्रवेश केला. त्यामुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला हा मोठा धक्का मानला जात आहे. विशेष म्हणजे शिवसेनेच्या दसरा मेळाव्यातही खासदार किर्तीकर यांनी जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली होती. तसेच, काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत जायला नको, असेही ते म्हणाले होते. आज एकीकडे आदित्य ठाकरेंनी राहुल गांधींच्या यात्रेत सहभागी होताच, इकडे किर्तीकर यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे.

किर्तीकर यांनी यापूर्वी स्पष्टपणे भूमिका मांडल्याने ते शिवसेनेसोबतच म्हणजे उद्धव ठाकरेंसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र, शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात त्यांनी आपली भूमिका मांडताना शिवसेनेनं काँग्रेस आणि राष्ट्रवादीबरोबर युती करुन चूकच केली, आता पुन्हा चूक नको असा सल्लाही जाहीरपणे दिला होता. त्यामुळे, ते शिवसेनेत नाराज असल्याची चर्चा रंगली. तेव्हापासून त्यांच्या शिंदे गटातील प्रवेशाची चर्चा सर्वत्र सुरू होती.

महासत्तेचा 'मध्यावधी' कौल

प्रतिनिधिगृह (काँग्रेस) आणि सिनेट या दोन्ही सभागृहांवर रिपब्लिकन पक्षाची एकहाती सत्ता येईल, या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या लाल लाटेत अध्यक्ष जो बायडेन यांच्या डेमॉक्रॅटिक पक्षाचा धुव्वा उडेल, असे अंदाज निवडणुकीच्या आधी वर्तविण्यात आले होते. मात्र, तसे घडलेले नाही. मतदारांचा मानस काय आहे, याचा अंदाज भारतातील निवडणूक तज्ज्ञ म्हणवणाऱ्यांनाच येत नाही, असे नाही; तर तो अमेरिकेतील तज्ज्ञांनाही येत नाही! हाती आलेले निकाल पाहाता २०२४च्या अध्यक्षीय निवडणुकीत पुन्हा एकदा माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी मिळेल का, यावर आता प्रश्नचिन्ह लागेल. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' म्हणत ट्रम्प यांनी उडवलेला वंशवादी प्रचाराचा धुरळा अद्याप पूर्णपणे खाली बसलेला नाही हे खरे; परंतु अमेरिकेबाहेरून येणाऱ्या व स्वस्तात राबणाऱ्या लॅटिन अमेरिकी, आशियाई अमेरिकी जनतेचे नुकसान केले आहे. अमेरिकेतील नोकऱ्या अविकसित, विकसनशील देशांतील तरुणांनी पळवल्या आहेत, आदी ट्रम्प यांच्या भूमिकेवर अमेरिकी जनता शिक्कामोर्तब करेल हा होरा चुकीचा ठरला आहे. जगभरातील उदारमतवादी व लोकशाहीप्रिय नागरिकांसाठी हा दिलासाच म्हणायला हवा. ट्रम्प यांनी निवडलेल्या अनेक उमेदवारांचा या निवडणुकीत प्रचंड मतांनी धुव्वा उडाला. काँग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाला निसटते बहुमत मिळणार, असे वाटत असले, तरी सिनेटबाबत मात्र अद्यापही अनिश्चितता टिकून आहे. प्रतिनिधिगृहाच्या सभापतिपदाच्या शर्यतीत ट्रम्पविरोधक रिपब्लिकन केविन मॅकार्थी पुढे आहेत. मात्र मॅकार्थी सभापती झाले, तरी काठावरच्या बहुमतावर सभागृह चालवणे व कायदे संमत करून घेणे यासाठी तारेवरची कसरत त्यांना करावी लागेल. त्यामुळे डेमॉक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांची दाढी कुरवाळण्याशिवाय त्यांना पर्याय नसेल. फ्लोरिडा राज्याचे गव्हर्नर म्हणून रॉन डिसॅन्टिस हे रिपब्लिकन दुसऱ्यांदा जिंकून आले आहेत. परंपरागत डेमॉक्रॅटिक पक्षाच्या इलाख्यातही त्यांना पाठिंबा मिळाल्याने रिपब्लिकन पक्षात त्यांचा दरारा वाढला आहे. डिसॅन्टिस यांनी रिपब्लिकन पक्षाच्या अध्यक्षपदासाठीच्या उमेदवारीसाठी दावा केलेला आहे. त्यामुळे पक्षांतर्गत निवडणुकीत ट्रम्प यांच्यासमोर ते तगडे आव्हान उभे करू शकतात. कोव्हिडनंतरच्या काळात व एकंदरच अमेरेकी अर्थव्यवस्थेत आलेली मंदी व महागाई निर्देशंकात गेल्या चार दशकांमध्ये झालेली सर्वाधिक वाढ यांमुळे अमेरिकी सामान्य नागरिक त्रासलेले आहेत. बायडेन यांच्या धोरणावर हे सामान्यजन नाराज असल्यानेच या मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमॉक्रॅटिक पक्षाला मोठा फटका बसण्याची शक्यता अनेक तज्ज्ञांना वाटत होती. मात्र, बायडेन यांच्या आर्थिक धोरणांबाबतच्या रागापेक्षा ट्रम्प यांच्या लोकशाहीला मारक विद्वेषपूर्ण भूमिकांना नाकारणे हे अमेरिकी जनतेला अधिक महत्त्वाचे वाटत असल्याचा निष्कर्ष या अपूर्ण निकालांमधून सध्या तरी काढता येऊ शकतो. बायडेन यांना हा तात्पुरता दिलासा असला तरी याचा अर्थ २०२४ ची अध्यक्षीय निवडणूक डेमॉक्रॅटिक पक्षासाठी सोपी असेल, असेही नाही. डिसॅन्टिस यांच्या नावावर रिपब्लिकन पक्षाने शिक्कामोर्तब केले, तर बायडेन व पर्यायाने डेमॉक्रॅटिक पक्षासाठी हे आव्हान सोपे नसेल. ट्रम्प यांच्या बहुतांश रिपब्लिकन समर्थक हरले; परंतु प्रामुख्याने श्वेतवर्णीय बेरोजगार तरुणांच्या त्यांच्यावर भाळलेल्या झुंडींची माथी कोणत्या कारणासाठी भडकावली जातील हे सांगता येत नाही. त्यातच युक्रेनबाबत आता अमेरिका नक्की कोणती भूमिका घेणार हा प्रश्नही या निवडणुकीमुळे पुढे आला आहे. रशिया विरोधातील युद्धात युक्रेनला शस्त्रास्त्रे व इतर मदत अमेरिकेने करायला हवी, असे अमेरिकेचे परंपरागत मित्र असलेल्या पाश्चिमात्य देशांना वाटत असले, तरी त्या खर्चाचा बोजा उचलण्यास रिपब्लिकन पक्षाचा विरोध आहे. युद्धाचा शेवट नक्की कसा होणार याबाबत युरोपीय देश चिंतेत आहेत. दोन महायुद्धे झेललेल्या या देशांना युक्रेन-रशिया तिढा हा तिसऱ्या महायुद्धाची नांदी वाटते आहे. युरोपातील बहुतांश देशांत हिवाळ्यात लागणाऱ्या अधिकच्या इंधनाची कमतरता युद्धामुळे भासते आहे. त्याचा थेट परिणाम वर्षानुवर्षांच्या भांडवलशाहीतून आलेल्या बहुतांश जनतेच्या चंगळवादी जीवनशैलीवर होत आहे. ब्रिटनसारख्या देशातही वीज कमी वापरणाऱ्यांसाठी सरकार विविध पुरस्कार जाहीर करत आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकी संसदेच्या या मध्यावधी निवडणुकांचे अन्वयार्थ जगभरात लावले जातील. भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाही देशावरही या महासत्तेच्या सारीपाटावर हलणाऱ्या सोंगट्यांचे मोठे परिणाम होत असतात. त्यामुळे कोण कुणाच्या पाठीवर हात टाकतो वा कुणाच्या प्रचाराला जातो, यावरून आंतरराष्ट्रीय राजकारणात बाजू न घेता ती देशातील जनतेच्या भवितव्याशी बांधिलकी म्हणून घेतल्यास, पुढील पिढ्यांचे भले होऊ शकते.

पनवेलमध्ये शरद युवा संवाद यात्रा ; राष्ट्रवादी युवक चे अध्यक्ष शनिवारी कळंबोलीत

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल दि. ११ (वार्ताहर) : राष्ट्रवादी युवक काँग्रेसची शरद युवा संवाद यात्रा शनिवारी पनवेल मध्ये येणार आहे. यानिमित्ताने कळंबोलीत बाईक रॅली आणि मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांचे आगमन होणार आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरे ही उपस्थित राहणार आहेत.

१२ डिसेंबर २०२१ ला राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने शरद युवा संवाद यात्रेचा शुभारंभ झाला. प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी या माध्यमातून महाराष्ट्र पिंजून काढण्याचा संकल्प केला आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसची संघटनात्मक बांधणी बरोबरच त्यांच्याशी संवाद साधून प्रेरणा ,प्रोत्साहन देण्याचा या पाठीमागे उद्देश आहे. त्याचबरोबर पक्षामध्ये जास्तीत जास्त युवा सहभागी व्हावेत या अनुषंगाने ही यात्रा आयोजित केली आहे. शरदचंद्रजी पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विचार पोचवण्याचा हेतू या पाठीमागे आहे. शरद युवा संवाद यात्रेला महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला. कोकण मध्ये या यात्रेचा शुभारंभ नुकताच झाला आहे. शनिवारी १२ नोव्हेंबर रोजी शरद युवा संवाद यात्रा पनवेल मध्ये येणार आहे. पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने या यात्रेच्या स्वागताची पूर्णपणे तयारी करण्यात आली आहे. राष्ट्रवादीचे पनवेल जिल्हाध्यक्ष सतिश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा युवक अध्यक्ष प्रमोद बागल यांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. या निमित्ताने सायंकाळी कळंबोली वसाहतीमध्ये बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर शामल मोहन पाटील शैक्षणिक संकुलामध्ये सभा संपन्न होणार आहे. यावेळी खासदार सुनील तटकरे उपस्थित राहून युवकांना मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्रमोद बागल यांनी दिली.

आदिवासींच्या विविध प्रश्नांवर राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र विकास आढावा समितीची बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । अलिबाग

राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र विकास आढावा समितीचे अध्यक्ष (मंत्री दर्जा) विवेक पंडीत व आदिवासी उपयोजनेतील कार्यान्वयीन यंत्रणांची आदिवासींच्या विविध प्रश्नांवर गुरुवार, दि.१० नोव्हेंबर २०२२ रोजी आगरी समाज हॉल, पेण येथे बैठक संपन्न झाली.

राज्यस्तरीय आदिवासी क्षेत्र विकास आढावा समितीचे अध्यक्ष श्री.पंडीत यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीकरिता निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.पद्मश्री बैनाडे, पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे, पनवेल तहसिलदार विजय तळेकर, रोहा तहसिलदार कविता जाधव, सुधागड तहसिलदार उत्तम कुंभार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, सहाय्यक प्रकल्प अधिकारी अरुण पवार, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण नियोजन अधिकारी आनंदकुमार हेमाडे व इतर कार्यान्वयीन यंत्रणा उपस्थित होत्या.

बैठकीच्या सुरुवातीला सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.पवार यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी तसेच प्रकल्प कार्यालयांतर्गत शैक्षणिक गुणवत्ता वाढीकरिता १४ शासकीय आश्रमशाळा कार्यान्वित असून त्यापैकी ९ आश्रमशाळा आयएसओ (खड्ज) नामांकन प्राप्त आहेत. तसेच १२ अनुदानित आश्रमशाळा व १२ शासकीय वसतिगृहे चालविण्यात येत आहे. त्याचबरोबर आदिवासी समाजाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीकरिता आदिवासी विकास विभाग कटीबद्ध असल्याचे सांगितले.

या बैठकीमध्ये आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आदिवासी बांधवांना जातीचे दाखले, रेशनकार्ड, आधारकार्ड इत्यादी आवश्यक प्रमाणपत्र प्राधान्याने देण्याबाबात अध्यक्ष श्री.विवेक पंडीत यांनी विचारणा केली. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी बांधवांसाठी प्रामुख्याने कातकरी समाजास जातीचे दाखले, रेशनकार्ड, आधारकार्ड, बालविवाह रोखणे, वनहक्क पट्टे वाटप, आरोग्य शिबिरे, स्थलांतर रोखणे, जॉब कार्ड वितरित करणे इ. प्रमाणपत्र वाटप करण्याकरिता स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणा यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमधून रायगड जिल्ह्यामध्ये साधारणतः १ लक्ष पेक्षाही अधिक प्रमाणपत्रे/दाखले वितरित करण्यात आल्याचे अवगत केले असता अध्यक्ष श्री.पंडीत यांनी जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी आदिवासी विकास विभागामार्फत राबविलेल्या व भविष्यात राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला. आदिवासी उपयोजनेमार्फत कार्यान्वयीन यंत्रणांना देण्यात येणाऱ्या निधीचा वापर आदिवासींच्या विकासासाठीच होतो किंवा कसे? याबाबत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांनी आढावा घ्यावा असे अध्यक्षांनी सुचित केले.

तसेच वनहक्क अधिनियम २००६ च्या अंमलबजावणीबाबत जिल्हास्तरावर एकही वनदावा प्रलंबित नसल्यामुळे अध्यक्ष श्री.पंडीत यांनी जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. जिल्ह्यामध्ये ज्या आदिवासींना वनपट्यांचे वाटप करण्यात आले आहे. त्यांच्या विकासाकरिता विविध योजना राबविण्याबाबत संबंधित कार्यान्वयीन यंत्रणांना निर्देश देण्यात आले.

या बैठकीदरम्यान उपस्थित आदिवासी संघटना प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा अधिकाऱ्यांनी निरसन व मार्गदर्शन केले. तसेच वन नेशन-वन रेशन अंतर्गत आदिवासी समाज बाहेरील राज्यांमध्ये स्थलांतरित असेल तरीही त्यांना त्या ठिकाणी रेशन उपलब्ध होईल याबाबत कुठल्याही अडचणी असल्यास त्याकरिता व्हॉट्सपद्वारे किंवा दूरध्वनीद्वारे सुद्धा अडचणींचे निरसन करण्यात येईल, असे जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके यांनी सांगितले. त्यानंतर कार्यान्वयीन यंत्रणांनी केलेल्या कामाबाबत व दिलेल्या माहितीबाबत अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले. या बैठकीचे सूत्रसंचलन कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ज्योती वाघ यांनी केले व शेवटी अध्यक्ष श्री.विवेक पंडीत यांच्या परवानगीने प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी सतिश शेरमकर यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठकीचा समारोप केला.

सुकेळी - गणपतवाडीच्या प्रलंबित रस्त्याची रोहा तहसिलदारांकडून पाहणी

दै.रायगड नगरी । नागोठणे

नागोठण्याजवळच असलेल्या व अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सुकेळी - गणपतवाडी येथील रस्त्याच्या कामामध्ये येथील काही शेतक-यांचा अडथळा येत आहे. त्यामुळेच या रस्त्याचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित राहिले आहे. याच रस्त्याची पाहणी तहसीलदार कविता जाधव व रा.जि.प.सदस्य तथा शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख किशोरभाई जैन यांनी बुधवार दि.९ नोव्हेंबर रोजी केली.

यावेळी रोहा पं. स.सदस्य संजय भोसले, ऐनघर ग्रामपंचायतीचे उपसरपंच रोहिदास लाड, सदस्य मनोहर सुटे, विनोद निरगुडे, किशोर नावळे, राजेंद्र कोकळे, जितेंद्र धामणसे, सचिन भोसले, जगन कोकळे, प्रकाश डोबळे, भगवान शिद, विठ्ठल इंदुलकर, नामदेव वाघमारे, यशवंत शिद, नारायण मोहिते, भरत भोईर, सामाजिक कार्यकर्ते राम तेलंगे, संतोषशेठ खाडे, सतिश सुटे, यशवंत वारगुडे, मालु शिद, नागोठणे तसेच ऐनघर सजाचे तलाठी, गणपतवाडी ग्रामस्थ तसेच ऐनघर पंचक्रोशीमधील नागरिक यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

देशाच्या स्वातंत्र्याचे रौप्य महोत्सवी वर्ष सुरु असतांनाच राज्यातील त्या त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांकडून एकीकडे विकासकामांवर गप्पा मारल्या जात असतांनाच सुकेळी - गणपतवाडी येथील आदिवासी बांधव मात्र स्वातंत्र्यपुर्व काळापासून आजपर्यंत रस्त्यासारख्या मूलभूत सुविधेपासुन वंचित आहेत. गेली अनेक वर्षांपासून येथील काही शेतक-यांचा या रस्त्याच्या कामात अडथळा येत असल्याचे माहित असतांनाही शासन वा कोणत्याही लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे लक्ष दिले नव्हते व तो सोडविण्याचा प्रयत्न केला नव्हता.

दरम्यान या विषयामध्ये ऐनघर ग्रामपंचायतीचे सदस्य विनोद निरगुडे व ग्रामस्थ गणपतवाडी यांनी रोहा तहसीलदार यांच्याकडे सुकेळी - गणपतवाडी येथील प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या कामात अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार अर्ज दाखल केल्यानंतर रोहा तहसीलदार कविता जाधव व रा.जि.प.सदस्य किशोरभाई जैन यांनी त्या रस्त्याच्या जागेची पाहणी करीत लवकरच ही समस्या सोडविण्यासाठी पुढील प्रक्रियेसाठी तलाठी सजा ऐनघर यांच्याकडे ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी गावातील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

केल्यानंतर न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी दिली. होती परंतु काल पोलीस कोठडी संपल्यानंतर न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी दिली आहे. सदरचे लैंगिक अत्याचाराचे प्रकरण अतिशय गंभीर असून आरोपींवरती कडक कारवाई व शिक्षा करण्यात यावी. अशी मागणी सामान्य जनतेमधून केली जात आहे.

अर्जदार तर्फे वकील
ॲड.सौ.तेजल मोरेश्वर गरुडे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.९८१/२०२२

श्री.मारुती निवृत्ती कोठारे अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक सो. ग्रुप ग्रामपंचायत आदई सामनेवाले

ज्यापेक्षा श्री.मारुती निवृत्ती कोठारे, रा.मु.पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड यांचे वडील कै.निवृत्ती माधव कोठारे यांचा मृत्यू दि.१६/०५/२०२१ रोजी राहत्या घरी मु.पो.आदई, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. अर्जदार यांनी या न्यायालयात सदरहू कै.निवृत्ती माधव कोठारे यांच्या मृत्यूची नोंद होणेकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदरहू कै.निवृत्ती माधव कोठारे यांचा वर नमूद ठिकाणी मृत्यू झालेला आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०९/११/२०२२ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

प्रस्तुतच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री.पद्माकर नारायण पाटील रा.चेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील मौजे : चेरवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्र.१४, हिस्सा क्रं.१, वैयक्तीक ८ अ खाते क्रं.१२२, धारणाधिकार-भोगवटादार वर्ग १ ज्याचे ७/१२ वरील एकूण क्षेत्र १-१८-०० (हे.आर.पॉ.) पैकी श्री.पद्माकर नारायण पाटील यांचे नावे शेतजमीन विक्रीचे क्षेत्र ०-६०-०० (हे. आर.पॉ) म्हणजेच ६,०००=०० चौ.मीटर्स व आकार रु.१=११ पैसे मात्र इतक्या क्षेत्रफळाची शेतजमीन मिळकत स्वकष्टार्जित मालकी हक्काने गेली १४ वर्षे उपरोक्त शेतजमीन मालक यांच्या निर्विवादपणे ताबेकब्जा व वहिवाटीत आहे. त्यानुसार सदर मिळकत ही आमचे अशिलांनी कायम खुषखरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध, दान, तारण, गहाण, बक्षिस, फरोक्त, अन्न, वस्त्र, दिवाबत्ती, पोटगी, जमन, वहिवाट, कुळ, विश्वस्त, मुखत्यार, विकसनकरार, बांधकाम करार, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, मृत्यूपत्र, इजमेंट, वारसाहक्क, बयाणा, तबदील या अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत खाली सही करणार वकील यांचेकडे योग्य त्या सर्व मुळ कागदपत्रे व पुराव्यांसह लेखी हरकती दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत लेखी हरकती व पुरावे न आल्यास वरील मिळकत ही निर्वेध व निर्जोखमी आहे, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या उपरोक्त मालकांसोबत ''खरेदीचा'' व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदर नोटीसीच्या विरुद्ध वर्तमान पत्रातील छापलेल्या जाहिराती, हरकती व सुचना तसेच मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही सुचना व हरकती, माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.११/११/२०२२

सही/-
ॲड.श्री.सचिन मा.कल्याणकर
प्लॉट क्र.१४२/अे, पहिला मजला,
मिडल क्लास हौ.सो.लि., युनियन बँकेच्यावर,
गांधी हॉस्पिटलच्या बाजूला, सुरूची हॉटेल समोर,
मुंबई-पुणे हायवे, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.क्र.९७६८३६६७१४/९८७०९८६१३५
इमेल ID : sachin.kalyankar11@gmail.com

मे.सकपाळ मॅडम यांचे कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.विकास अ. बडे

जाहीर नोटीस

खालापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.२८८/२०२२

श्री.कश्यप कमलेश कुमार धार
वय : ३८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ए २०१, नील सृष्टी, प्लॉट नं.१९,२०,२१,
श्रीराम चिट फंड, सेक्टर ४, न्यू पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामविकास अधिकारी सो.
ग्रुप ग्रामपंचायत वासांबो, मोहोपाडा,
ता.खालापूर, जि.रायगड सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.कश्यप कमलेश कुमार धार हे अर्जदार असून त्यांचा जन्म दि.२४/०८/१९८४ रोजी एच.आय.एल.कॉलनी, चांभार्ली, मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद करून मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालयात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील व अर्जदार श्री.कु.कश्यप कमलेश कुमार धार यांचा जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये यांच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.२/११/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया., खालापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया., खालापूर

सर्प मित्र संदीप घरतने दिले अजगरला जिवदान

दै.रायगड नगरी । मुरुड

मुरूड एकदरा पुलाजवळ मंगेश कासेकर यांच्या घरासमोरील रस्त्यावर अजगर जाताना मितेश पाटील याने पाहीला त्वरित ही बाब मंगेश कासेकर यांच्या लक्षात आणून दिली.

मंगेश कासेकर यांनी सर्प मित्र संदीप घरत यांना पाचारण केले होते. सर्प मित्र घटनास्थळी दाखल झाले व या अजगरला जेरबंद केले. व या अजगरला वनखात्याच्या सहाय्याने जंगलात जाऊन सोडून दिले.

न्यू ऊमा को.ऑप.हौ.सोसायटी लि. पनवेल

रजिस्टर नं.RGD/PWL/HSG (PMC) 1367, सन १९९६-९७
लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड, पिन ४१०२०६

जाहीर निविदा सूचना

न्यू ऊमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल, नोंदणी क्र. RGD/PWL/HSG/TC/1136/1996-97 Dtd.04/02/1997, मालमत्ता क्र.५६८/ड, तर्फे सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी इमारत बांधकाम गृहनिर्माण क्षेत्रातील डेव्हलपर्स / कंत्राटदार म्हणून नेमणूक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या अनुभवी व कमीतकमी १५ (पंधरा) वर्षे गृहनिर्माण बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक अनुभव अहर्ता असलेल्या बिल्डर्स / डेव्हलपर्स व्यक्ती अथवा संस्था / कंपनी यांचेकडून टेंडर (निविदा) मागविण्यात येत आहेत. याकामी टेंडर (निविदा) या आमच्या गृहनिर्माण संस्थेच्या व आमचे प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटंट श्री.पाडळीकर कंन्सलटंट, अलिबाग यांचे कार्यालयाकडे दि.१६/११/२०२२ ते २३/११/२०२२ पर्यंत ना परतावा शुल्क दराने रु.५,०००/- (पाच हजार मात्र) प्रत्येकी उपलब्ध आहेत. याकामी योग्य रितीने संपूर्ण भरलेल्या टेंडर (निविदा) स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.२३/११/२०२२ रोजी संध्याकाळी ६.०० (P.M) वाजेपर्यंत असेल. या कामासाठी आलेल्या एक किंवा सर्व निविदा (टेंडर) स्वीकारण्याचे अथवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे आमच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेने स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत.

स्थळ : पनवेल
दि.११/११/२०२२

सही/-
अध्यक्ष/सचिव
न्यु ऊमा सहकारी गृहनिर्माण संस्था,
मालमत्ता क्रं.५६८/ड, नवीन कोर्टाच्या जवळ,
लोखंडीपाडा, पनवेल, जि.रायगड-४१०२०६
मो.क्र.८१६९४९८७००/९३२४३७४८६८

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्रीमती.रेखा सुभाष जगदाळे, रा.ए.९०१ को. ऑप.हौ.सोसा. सुंदर नगर, कालिना सांताक्रुज (इस्ट), मुंबई-९८ यांच्या कायदेशीर मालकीच्या ताबेकब्जातील आहेत.

मिळकतीचे परिशिष्ट

तुकडी व जिल्हा : रायगड, पोट तुकडी व तालुका : पनवेल, येथील मौजे : पळस्पे तसेच मे.सब रजिस्टार साहेब पनवेल, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पनवेल आणि पळस्पे ग्रामपंचायत यांच्या हद्दीतील, ग्रामपंचायत पळस्पे यांच्या कार्यालयात नमुना नं.८ (ॲसेसमेंट लिस्ट) उताऱ्याचे सन २०१५-१६ मध्ये नोंद असलेली खालीलप्रमाणे वर्णनाची घरासह जमीन मिळकती आहे.

अनु क्र.	रस्त्याचे नाव	मालमत्ता क्र.	मालकाचे नाव व भोगवटादाराचे नाव	मालमत्तेचे वर्णन	मिळकत बांधकाम चे वर्ष	क्षेत्र चौ.फूट / चौ.मी.	एकूण कर रुपये
३४७	विष्णू मंदिर रस्ता	१९१/अ	रेखा सुभाष जगदाळे स्वतः	१९१/अ	२०२१/२२	८१०४	२०२६

वरील घरासह जमीन मिळकती मधील तद्‌गभूत वस्तूसहीत असलेले झाडझाडोरा दगड, विहिर, बांधबंदिस्त, पाषाण, वहिवाट, वगैरे अर्तरभूत हक्क अधिकार यासह एकत्रित उल्लेख केला जाईल.

वरील वर्णनाची घर व घरासह असलेली जमीन सुमारे ८१०४ चौ.फुट (७५३ चौ.मी.) क्षेत्र दि.१२/०८/२०१० रोजी नोंदणी क्र.९७४६/२०१० या नोंदणीकृत खरेदी खताने आमचे अशिलांनी खरेदी केलेली असून दि.१२/०८/२०१० पासून आमचे अशिलांना खुला व शांततामय विना अडथळा ताबाकब्जा कायदेशीर मालकी हक्क आहे.

तरी वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीच्या कोणत्याही गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूली वाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काचे बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिलांना सर्च टायटल रिपोर्ट दिला जाईल त्यानंतर आमचे अशिल बांधकाम / विकसनाचे अनुषंगाने प्रचलित कायदेशीर व इतर सर्व आवश्यक कायदेशीर तरतुदींची पुर्तता करून आमचे अशिल वरील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत विकसित करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

पनवेल
दि.११/११/२०२२

सही/-
ॲड.मनोज तुकाराम म्हात्रे
पीएल, ५ बी, ६/६, खांदा कॉलनी, नवीन
पनवेल (पश्चिम), ता.पनवेल, जि.रायगड

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

नाताळ पूर्वी माथेरानचे रस्ते होणार चकाचक

दै.रायगड नगरी । माथेरान

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या माथेरान बाजारपेठेतील महात्मा गांधी मार्गाला मुहूर्त सापडला असून या कामास सुरुवात झाल्याने ख्रिसमस पूर्वी माथेरान बाजारपेठेतील रस्ता धूळविरहित होण्याचा मार्ग मोकळा झाला असून लवकरात लवकर मुख्य बाजारपेठेतील हा रस्ता पूर्ण करावा असे मागणी येथील व्यापारी वर्गाकडून होत आहे.

माथेरान मधील अनेक रस्ते क्ले पेव्हर ब्लॉकने केले जात असून एम एम आर डी ए च्या माध्यमातून या कामांना मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झालेला आहे. त्यानुसार माथेरानला प्रवेश करणारा मुख्य रस्ता असलेल्या महात्मा गांधी मार्गाचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू झाले आहे. परंतु हे काम पावसाळ्यापूर्वी येथील दिवाडकर हॉटेल पर्यंत आल्यानंतर बंद झाले होते. परंतु येथूनच पुढे खऱ्या बाजारपेठस सुरूवात होत असल्याने हे काम कधी पूर्ण होणार अशी वारंवार विचारणा माथेरान मधील स्थानिक नागरिकांकडून होत होती परंतु आता पावसाळा थांबल्यानंतर या कामाला सुरुवात झाली असून यापूर्वी लावण्यात आलेले सिमेंटचे ब्लॉक काढून तेथे नवीन क्ले पेव्हर ब्लॉक बसवण्याच्या कामास आता सुरुवात होत आहे जुने ब्लॉक काढण्यास जलदगतीने सुरुवात झालेली आहे त्यामुळे माथेरान मधील मुख्य रस्ता हा धूळ विरहित होणार असून पर्यटकांना व नागरिकांना या रस्त्यावरून चालताना धुळीपासून दिलासा मिळणार आहे.

येथील चढावाच्या ठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉक वरून सहा महिन्यांमध्ये काही वेळा घोडे घसरण्याचे प्रकार घडले असल्याने येथील घोडेवाल्यांनी चढावाच्या ठिकाणी क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्याकरिता आपला विरोध दर्शविला होता त्यानुसार हे काम बंद करण्या साठी मोर्चाही काढला होता कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन या समस्येवर तोडगा काढण्याचे निवेदनही त्यांना दिले होते त्यानुसार आमदारांनी एमएमआरडीए अभियंता याची भेट घेऊन यावर तोडगा काढताना चढावाच्या ठिकाणी घोड्यांच्या वापरासाठी दीड मीटर जांभा दगडाचा वापर करून रस्ता बनवावा असेच सुचविल्याने पुढील कामाच्या रस्त्याचा मार्ग मोकळा झाला होता व आता मुख्य बाजार पेठेतील कामे सुरू झाल्याने माथेरान करांमध्ये आनंदाचे वातावरण दिसत आहे.

माथेरान मध्ये लवकरच महत्वकांशी रिक्षा प्रकल्प सुरू होणार असल्याने मुख्य बाजारपेठेतील रस्ते क्ले पेव्हर ब्लॉकने होत असल्याने या रस्त्यांवरून ई रिक्षाचा मार्ग सुकर तर सुकर होणारच आहे परंतु ह्या रस्त्यावर चालणाऱ्या मालवाहू हात गाड्या व सध्या अस्तित्वात असलेल्या हात रिक्षा यांनाही दिलासा मिळणार आहे. संपूर्ण कामावर नगरपरिषदेच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे(शिंदे) या स्वतः लक्ष देऊन ही विकास कामे पूर्ण करून घेताना दिसत आहेत.

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६६ वा महापरिनिर्वाण दिन निमित्त बैठक संपन्न

दै.रायगड नगरी । पनवेल

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६६ वा महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर २०१२ रोजी चैत्यभूमी दादर - मुंबई येथे संपन्न होणार आहे, स्वाभिमानी युथ रिपब्लीकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी या कार्यक्रमाच्या अनुशंगाने रायगड जिल्यातील व पनवेल तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली या बैठकीत पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थीत राहण्याकरीता व जाण्यायेण्याची व्यवस्था करण्याकरीता बैठका आयोजीत करण्याचा निर्णय घेण्यात आला .

६ डिसेंबरला रोजी सकाळी १०.०० वाजता पनवेल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून सर्व कार्यकर्ते दादर येथे जाणार आहेत. सायंकाळी ५.०० वाजता पक्षाचे संस्थापक, राष्ट्रीय भिमसैनिकाना अध्यक्ष मनोज संसारे करणार आहेत. सर्व देशभरातून बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी भिमसैनीक चैत्यभूमी येथे दरवर्षी येतात. महेश साळुंखे यांनी मुंबई महानगरपालीका प्रशासनाकडे मागणी केली आहे की सर्व भिमसैनीकांना प्राथमिक सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. कोरोना नंतर प्रथमच बाबासाहेबांचा स्मृतीदिन संपन्न होत आहे. त्यामुळे लाखो भाविक या टिकाणी अभिवादन करण्यासाठी जमा होणार आहेत. या सर्वांची नोंद घेऊन योग्य ती तरतूद महानगरपालिके तर्फे करण्यात यावी. अशी विनंती रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी केलेली आहे.

तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत खांब हायस्कूलने पटाकावले विजेतपद

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या द.ग.तटकरे ज्युनि.कॉलेज व श्री.रा.ग.पोटफोडे(मास्तर) विद्यालय खांब या.रोहा यांनी तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत विजेतपद पटकावले आहे

रोहे तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याला प्राधान्य देण्याच्या उद्देशाने रोहे पं.समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा सुकेळी येथील झी स्कूल जिंदाल येथे संपन्न करण्यात आली.

या स्पर्धेत श्री.रा.ग.पोटफोडे (मास्तर) खांब या विद्यालयाचे १४ वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात कोएसो मेहेंदळे हायस्कूल संघाचा पराभव करून विजेतपद पटकावले.

विद्यालयाचे या यशाबद्दल चेअरमन महेंद्र पोटफोडे व संस्थेचे सर्व संचालक मंडळाचे पदाधिकारी, मुख्याध्यापक सुरेश जंगम व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग तसेच विभागातील क्रीडाप्रेमी नागरिक यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व्यक्त करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) साहेब यांचे न्यायालयात, उरण

दि.चौ.अर्ज नं.१३/२०२१
नि.नं.५४/ड
ने.ता.१७/११/२०२२

१) श्री.सुरेश यशवंत जोशी
२) श्री.रमेश यशवंत जोशी
३) श्री.विलास यशवंत जोशी
४) श्री.नरेश यशवंत जोशी
५) श्री.जगदीश यशवंत जोशी
६) श्री.राजेश यशवंत जोशी
७) श्री.प्रकाश यशवंत जोशी
८) श्री.यतीदास यशवंत जोशी
९) सौ.मिना नथुराम बंडा
१०) सौ.कविता विनायक पाटील अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. सिताबाई यशवंत जोशी ह्या मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड येथे दि.१९/०२/२०१९ रोजी मयत झालेले आहेत. कै.सिताबाई यशवंत जोशी यांचे मालकीची व ताबे कब्जे वहिवाटीतील शेतजमीन मिळकत खालील वर्णन केलेल्याप्रमाणे

मौजे : नवघर, ता.उरण, जि.रायगड

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	गुंठे
३७/८२-८३	२१	४	०-०५-०
	२२	८	०-२६-८
३६१/८३-८४	७९	६	०-०१-४
	९१	१२	०-०५-४
	९३	४	०-०७-४
३६१/८५-८६	२	२	०-१२-०
	२	६	०-०९-०
	२	८	०-१५-४
	२	१०	०-१०-०
	२	११	०-०५-०
	२	१४	०-१३-४
	२	१५	०-१३-८
	५	१३	०-०८-८
	५	१४	०-०८-८
	११	१०	०-०३-१२
	१६	१	०-०६-४
	१४	१	०-०३-१२
	२७	३	०-०३-४
	४०	१	०-२८-८
	४९	६	०-०७-४
	५३	१०	०-०१-०
	५४	७	०-०२-८
	५५	४	०-०१-१२
	५९	५	०-००-४
	६०	१३	०-०२-०
	६५	२	०-०३-८
	१०७	६	०-०३-८
	१०४	११	०-०२-८
	९८	२	०-०१-८
	१२०	८	०-०२-०
	१२२	३	०-१७-४
	१२५	५	०-०७-१२
	१३०	५	०-०६-८
	१३४	१३ ब	०-०९-०
	१४४	१३	०-०३-८
	१४६	२	०-०४-४
	१४६	७	०-०१-१२
	१४६	११	०-०२-०
	१८०	४	०-०५-१२
	१८१	५	०-११-८
	१८२	४	०-१३-४
	२००	२	०-१४-४
	२०१	७	०-१४-८
	२१२	२	०-१५-८
	२१७	१२	०-०५-४
	२२१	१	०-१७-१२
	२२७	६	०-१०-०
	२२८	२	०-०६-८
	२३४	३	०-१२-४
	२७७	६	०-०२-८
	२९४	४	०-०४-०
	२९४	७	०-०२-१२
	२९४	८	०-११-०
	२९५	१	०-१२-०
	२९५	४	०-०४-१२
	२९५	७	०-०५-१२
	२९७	१	०-२१-१२
	२९७	११	०-०२-४
	२९८	१ अ	०-१७-०
	२९८	१ ब	०-१७-०
	२९८	४१	०-१४-४
	२९८	८	०-१६-८
	२९८	९	०-१४-४
	२९९	२	०-०४-४
	२९९	५	०-०४-४
	२९९	७	०-०६-१२
	२९९	१०	०-०४-८
	२९९	१२	०-१८-८
	१३४	१ अ	०-०३-१२

वरील मिळकतीच्या कै.सिताबाई यशवंत जोशी यांच्या सहमालकी हक्काच्या असून त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार मिळण्यास पात्र आहेत. वर वर्णन केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत लेखी अथवा तोंडी हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकती दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.न्यायालयात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान केले जाईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. आज दि.१४ माहे १० सन २०२२ रोजी आचे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

ॲड.मच्छिंद्रनाथ आत्माराम घरत

जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१.कै. किशोर शंकर पाटील
१/१ श्रीमती. किशोरी किशोर पाटील
वय - ५७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
१/२ श्री. प्रविण किशोर पाटील
वय - ३१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
१/३ श्री. कुणाल किशोर पाटील
वय - ४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
१/४ श्री. केतन किशोर पाटील
वय - २८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. वरील अर्जदार क्र. १/१ ते १/४
रा. मराठी स्कुल जवळ, बोकडवीरा,
ता. उरण, जि. रायगड,पिन- ४००७०२ अर्जदार

विरूध्द

१. कै. पुष्पा रघुनाथ मढवी
उर्फ पुष्पा शंकर पाटील (मयत तर्फे वारस)
२/१ श्री. महेश रघुनाथ मढवी
वय ४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालया जवळ, पिंपळे गुरव, पुणे -४११०२७
२/२ श्री. शैलेश रघुनाथ मढवी
वय -४४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल
कार्यालया जवळ, नवी सांगवी, पुणे -४११०२७
२/३ श्रीमती. हेमलता नितीन म्हात्रे (लग्नानंतरची)
उर्फ हेमलता रघुनाथ मढवी
वय - ३९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. घर नं. २२, कवडे नगर, गणेश मंगल कार्यालया जवळ,
नवी सांगवी, पुणे -४११०२७
२. श्रीमती. रशीला आत्माराम म्हात्रे
उर्फ रशीला शंकर पाटील
वय - ३९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. गणपती मंदिरा जवळ, घर नं. ८९४, नागाव,
ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
३. श्री. विलास शंकर पाटील
वय - ६३ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. बोकडवीरा, ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
४. श्री. नंदकुमार शंकर पाटील
वय - ६१ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
रा. आनंद नगर, रूम नं. १ बी विंग, ग्राऊड लोर
ता. उरण, जि. रायगड, पिन- ४००७०२
५. श्रीमती. जयवंती महादेव पाटील
उर्फ जयवंती शंकर पाटील
वय - ५१ वर्षे, व्यवसाय -गृहिणी
रा. ए. ३०३ राम राजश्री, सि.एच.एस.
लिमिटेड. न्यु गोल्डन नेस्ट रोड, इंद्रलोक
फेम - २ भायंदर (पुर्व), ठाणे - ४०११०५
६. श्रीमती. संगीता नरेश पाटील
उर्फ संगीता शंकर पाटील
वय - ५१ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. घर नं. ४ बोकडवीरा, ता. उरण,
जि. रायगड, पिन- ४००७०२
७. श्रीमती. देवायानी दत्तात्रय म्हात्रे
उर्फ देवायानी शंकर पाटील
वय - ४६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. मराठी शाळे मागे, सेक्टर २०,
नेरूळ रोड, इर्ड. स. ओ. ठाणे
८. कै. हरिश्चंद्र बाळाराम पाटील (मयत तर्फे वारस)
१. हेमचंद्र हरिश्चंद्र पाटील
वय - ६२ वर्षे, व्यवसाय - नोकरी
२. श्री. नरेद्र हरिश्चंद्र पाटील (मुलगा)
वय - ५२ वर्षे, व्यवसाय - नोकरी
३. श्रीमती. नीरबाई चंद्रकांत पाटील (मयत तर्फे वारस)
उर्फ नीराबाई हरिश्चंद्र पाटील
३/१. श्री. रंजीत चंद्रकांत पाटील
वय -३५ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड
३/२. श्री. अमोल चंद्रकांत पाटील
वय - २८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड
३/३. श्री. शोभना चंद्रकांत पाटील
वय - २६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. केगाव आवेडा, ता. उरण, जि. रायगड
३/४. श्री. कुमार चंद्रकांत पाटील
वय - २४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड
४. श्रीमती. गुलाब शांताराम पाटील
ऊर्फ गुलाब हरिश्चंद्र पाटील
वय - ५४ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
वरील सामनेवाला क्र. १ ते ४
रा. बोकडवीरा, ता. उरण, जि. रायगड
५. श्रीमती. रेवती किशोर घरत
ऊर्फ रेवती हरिश्चंद्र पाटील
वय - ४८ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा. कोहिनुर मिळ चाळ नं. ९,
वडाळा, मुंबई पिन -
६. श्रीमती. चित्रा महेन्द्र घरत
ऊर्फ चित्रा हरिश्चंद्र पाटील
वय - ४६ वर्षे, व्यवसाय -
रा. करंजा, ता. उरण, जि. रायगड
७. श्रीमती. बेबी हरिश्चंद्र पाटील
वय - ४२ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा. बोकडवीरा, ता. उरण, जि. रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहिर नोटिसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै. बाळाराम धर्मा पाटील यांचे निधन- बोकडविरा, ता. उरण, जि. रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै. बाळाराम धर्मा पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. बाळाराम धर्मा पाटील यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरीता भुसंपादीत केलेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड

अ.क्र.	गावाचे नाव/युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र
१.	बोकडविरा ३०/८५	२३	५अ	०-१९-६
२.	बोकडविरा ५२/८६	१८१	६	०-१२-१
३.	बोकडविरा २८५/८७	११४	७	०-१५-७
४.	बोकडविरा ३३/८५	१३३ १२९	५ ५	०-०३-८ ०-७-३
५.	बोकडविरा ६१/८६	२३	५अ	०-१९-६
६.	बोकडविरा १४२	१	४	०-०३-६
		३	४	०-०८-३
		३	११अ	०-०१-१
		३०	१	०-१४-९
		४४	८	०-०८-०
		५४	७	०-०३-८
		५८	३	०-२१-५
		६४	५	०-१६-७
		७३	६	०-४८-०
		७५	४५	०-२०-०
		१३६	२	०-१६-४
		१५१	३८	०-०२-५
		१	७	०-०३-०

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र. १ ते ४ आणि सामनेवाले क्र. १ ते ८(तसेच सामनेवाले क्र. २/१ ते २/३ आणि सामनेवाले क्र. ३/१ ते ३/४) हे कै. बाळाराम धर्मा पाटील यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना. कोर्टात प्रस्तूतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबददल कोणीही व्यक्तीस हरकत दयायची असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकिलांमार्फत न्यायालयांत हरकत न घेतल्यास ना. कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरिल अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

आज ता.११/११/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी सदरची जाहिर नोटीस दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

मुरुडच्या श्रीसंतगोरा कुंभार बागेजवळील मोडकळीस आलेल्या टपरीचा होतोय प्रसाधन गृहाचा वापर

दै.रायगड नगरी । कोर्लई

गेल्या अनेक वर्षांपासून मुरुडच्या श्रीसंत गोरा कुंभार बागेजवळील मोडकळीस आलेल्या टपरीचा वापर प्रसाधनगृह होत असल्याने सदरची टपरी तातडीने हटविण्याची मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे. मुरुड -आगरदांडा रस्त्यावर नगरपरिषदेच्या हद्दीतील श्रीसंत गोरा कुंभार बागेजवळ गेल्या अनेक वर्षांपासून असलेली ही टपरी मोडकळीस आलेली असून तिचा वापर वाटसरू अक्षरशः प्रसाधनगृहा सारखा करीत असल्याने आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.याची नगरपरिषदेच्या संबंधित अधिकारी वर्गाने दखल घेऊन सदरची मोडकळीस आलेली टपरी तातडीने हटविण्याची मागणी नागरिकांतून जोर धरीत आहे.

मा.गोडसे सो
अर्जदाराचे वकील श्री.एच.जे.शेळके

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१४५९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१३/१२/२०२२

श्री.पांडुरंग सिताराम पावणेकर वगैरे अर्जदार

विरुद्ध

सौ.ताईबाई जाना म्हात्रे सामनेवाले

१) अर्जदार व सामनेवाले यांचे वडील कै.सिताराम झुग्या पावणेकर हे दि.११/०१/१९८९ रोजी मु.कामोठे येथे मयत झालेले असून कै. सिताराम झुग्या पावणेकर यांची पत्नी कै.गंगुबाई सिताराम पावणेकर ही देखील रोजी मयत झालेली असून कै.सिताराम झुग्या पावणेकर यांची आई कै.रामूबाई झुग्या पावणेकर ही देखील पूर्वीच मयत झालेली आहे. अर्जदार व सामनेवाले हे सख्खे बहिण-भाऊ आहेत. मात्र सामनेवाले सौ.ताईबाई जाना म्हात्रे ही अर्जदार यांची बहिण असून देखील तीने सदर अर्जावर सही करण्यास व मे.कोर्टासमोर हजर राहण्यास नकार दिल्यामुळे तिला सदर अर्जाच्या कामी सामनेवाली म्हणून समाविष्ट केलेली आहे. मात्र सामनेवाली ही देखील कै.सिताराम झुग्या पावणेकर यांची मुलगी म्हणून वारसदार आहे.

खालील वर्णन केलेली मिळकत ही अर्जदार व सामनेवाले यांचे वडील कै.सिताराम झुग्या पावणेकर यांच्या मालकीच्या होत्या व आहेत. सदर मिळकती सिडको महामंडळाने नवी मुंबई गावठाण विस्तार योजनेकरिता संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
कामोठे, युनिट केस नं.३७६	११७	२ क	०-१३-९	२.१२
	२०७	५ ब	०-०३-०	०.४४
	२०८	३	०-०६-८	१.००
	१६४	६	१-१७-०	३.८७
	१८८	४	०-०२-४	०.२८
	२०१	४	०-०२-१२	०.४४
कामोठे, युनिट केस नं.३७६ अ	२०१	७	०-०३-३	०.२८
पनवेल, युनिट नं.४९२	६१६	५	१-२८-४	४.२०
	६१९	७	०-३७-५	२.९४
पनवेल, युनिट नं.४९२	६२०	१०	०-३८-२	३.१२
	६२०	९	०-११-१	०.८७
	६२०	५	०-०७-३	०.६१
	६२०	३	०-०९-९	०.८१
पनवेल, युनिट नं.४९२ (१)	५४९	५	१-१७-८	५.५०
पनवेल, युनिट नं.४९२ (२)	६१७	९	१-०७-८	२.९४

अशा वर्णनाची मिळकत आहे. यापुढे सोईकरिता वर नमूद मिळकतीस ''सदर मिळकत'' असे संबोधण्यात येईल.

अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केला आहे. सदरहू अर्जदार व सामनेवाले सदरहू मयताचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास अर्जदार व सामनेवाली यांना सदरहू मयत कै.सिताराम झुग्या पावणेकर यांचे कायदेशीर वारसाचे सर्टीफिकेट देण्यात येईल.

दि.११ माहे नोव्हेंबर सन २०२२

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

वावंजे परिसरात दिसला बिबट्या

दै.रायगड नगरी । पनवेल

अरीवली–आष्टे पाठोपाठ वावंजे परिसरात नागरिकांना बिबट्या दिसून आला आहे. त्यामुळे सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे. पनवेल तालुक्यात गेल्या दहा दिवसांपासून नागरिकांना अरिवली–आष्टे परिसरात बिबट्याचे दर्शन होत आहे. त्यातच वावंजे परिसरात येथील ग्रामस्थांना बिबट्या दिसून आला. बिबट्या दिसल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाली आहे. या व्हिडिओत बिबट्या स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे नागरिकांना सावधानता बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अरीवली परिसरातील बिबट्या वावंजे परिसरात आला असेल असे सांगितले जात आहे. या परिसरात हाजी मलंग डोंगर देखील असून हा भाग जंगलमय आहे. त्यामुळे येथे बिबट्या शिकारीसाठी आला असेल असे सांगितले जात आहे.

म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पाभरे गण पक्ष कार्यालयाचे उद्घाटन

दै.रायगड नगरी । म्हसळा

माहे ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत राज्यात मुदतीत संपणाऱ्या सात हजारहुन अधिक स्थानीक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाचे बिगुल वाजले आहेत.सार्वत्रिक निवडणूकीत रायगड जिल्ह्यात २४० ग्राम पंचायतीच्या निवडणुका होणार आहेत.जिल्ह्यात जास्तीत जास्त ग्राम पंचायती आपले पक्षाचे ताब्यात राखण्यासाठी सर्वच राजकिय पक्षांनी जय्यत तयारी सुरू केली आहे.त्याच धर्तीवर राष्ट्रवादीचा बालेकिल्ला असलेल्या म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक हाती सत्ता कायम राखण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पाभरे गटाचे गण अध्यक्ष अनिल बसवत,विभाग प्रमुख गजानन पाखड,माजी उपसभापती संदीप चाचले यांनी म्हसळा शहराचे मध्यवर्ती असलेल्या प्लाझा वन मध्ये पक्षाचे संपर्क कार्यालय उघडले आहे या नूतन कार्यालयाचे उद्घाटन युवा नेते आमदार अनिकेत तटकरे यांचे हस्ते करण्यात आले.या वेळी आमदार अनिकेत तटकरे यांनी म्हसळा तालुक्यात होत असलेल्या १३ ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका बाबत माहिती घेतली आणि पुढील नियोजनाची सूचना उपस्थित पक्ष कार्यकर्त्यांना केली.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

मूलभूत सुविधा पनवेल मनपाच्या अखत्यारीत ; पाणी वगळता पायाभूत सोयी महापालिका पुरवणार

सिडको नोडमध्ये प्राधिकरणाची जबाबदारी जवळपास संपली

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेच्या स्थापनेला सहा वर्ष पूर्ण झाले आहेत. दरम्यान दुहेरी कराच्या मुद्द्यावरून मालमत्ता कर एक प्रकारे पेचात सापडला होता. परंतु पनवेल मनपाने जवळपास सर्वच सोयीसुविधा देण्यास सुरुवात केली आहे. पाणी आणि इतर तत्सम बाबी वगळता बाकी मूलभूत सोयी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून पुरवण्यास सुरुवात झाली आहे. परिणामी वसाहतींमध्ये सिडकोची जबाबदारी बऱ्याच अंशी कमी झाली आहे.

पनवेल परिसरामध्ये सिडकोने वसाहती विकसित केल्या. दक्षिण नवी मुंबई म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या कॉलनीमध्ये नियोजन प्राधिकरण सिडकोच होते. सहा वर्षांपूर्वी या वसाहतींचा पनवेल महानगरपालिकेमध्ये समावेश करण्यात आला. मात्र सेवा सिडको कडूनच पुरवल्या जात होत्या. सुरुवातीला पनवेल मनपा ने घनकचरा व्यवस्थापन. साफसफाई त्याचबरोबर धूर फवारणी आपल्याकडे घेतली. सिडको पेक्षा जास्त सुसूत्रता महापालिकेने आणली. दरम्यान त्यानंतरही इतर सुविधा सिडको कडून पुरवल्या जात होत्या. त्या बदल्यामध्ये सेवाशुल्क सुद्धा घेतले जात होते. महानगरपालिकेने मालमत्ता कर लागू केला. सिडको आणि महापालिकेला दुहेरीकर का द्यायचा अशा प्रकारचा मुद्दा पुढे करून काही सामाजिक संस्था आणि संघटनांनी थेट न्यायालयामध्ये धाव घेतली. या पार्श्वभूमीवर सोयी सुविधा हस्तांतरित करून त्या स्वतः वसाहतींना पुरवण्याचा निर्णय पनवेल महानगरपालिकेने घेतला. यासाठी मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यानुसार पाणीपुरवठा वगळता इतर सुविधा सिडकोने महानगरपालिकेकडे वर्ग केल्या आहेत. या अगोदरच उद्यान पनवेल मनपाकडे आले आहेत. त्यांचे सुशोभीकरण आणि सौंदर्यकरणाचे काम हातात देण्यात आले आहे. त्याचबरोबर आरक्षित भूखंड सुद्धा महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. त्यावर सुद्धा क्रीडांगणे क्रिकेट अकॅडमी विकसित करण्यात येत आहे. रोज बाजारासाठी ज्या जागा राखीव होत्या त्या सुद्धा महापालिकेने बाजार भाव मूल्य देऊन आपल्याकडे घेतले आहेत. येथे पथविक्रेत्यांचे राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार पुनर्वसन करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त पनवेल महानगरपालिकेने सिडको वसाहतीतील रस्त्यांचा ताबा आपल्याकडे घेतला आहे. नोडनिहाय एजन्सी नियुक्त करून रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आले आहेत. पदपथ, मलनिस्सारण वाहिन्या त्याचबरोबर पथदिव्यांची देखभाल सुद्धा यापुढे मनपाच करणार आहे. मल: निसारण केंद्र सुद्धा दुरुस्त करून ते महापालिकेकडे हस्तांतरित केले जाणार आहेत.

दुहेरी कराचा मुद्दा उपस्थित करत मालमत्ता करायला काही सामाजिक संस्था आणि संघटना विरोध दर्शवत आहे. मात्र आता सोयी सुविधा सिडको ऐवजी महापालिका पुरवणार आहे. त्यामुळे प्राधिकरण यापुढे सेवा शुल्क वसूल करणार नाही. परिणामी पनवेल महापालिकेचा एकच कर मालमत्ता धारकांना भरावा लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेला हा कर देणे बंधनकारक आहे. या पार्श्वभूमीवर आता मालमत्ता कराचा मार्ग त्याचबरोबर अडसर आणि तांत्रिक अडथळे एक प्रकारे दूर झाले आहेत.

यशवंती खार शेतकऱ्यांचा तोंडचा घास हिरावला ; मदतीला कोणीच नाही

दै.रायगड नगरी । दिघी

दिघी – श्रीवर्धन तालुक्यातील शिस्ते – दिवेआगर मार्गावरील यशवंती खारभूमीलगत असणाऱ्या खाडीचे दरवाजे तुटल्याने तयार भात पिकांना जबरदस्त फटका बसला आहे. कापून ठेवलेल्या पिकांची दैनाच झाल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे.

दिवेआगर खाडी लगत बोर्लीपंचतन परिसरातील चार ते पाच गावांतील अनेक शेतकऱ्यांची ४०० हेक्टर क्षेत्रात खारशेती जमीन आहे. त्यात शेतकरी दरवर्षी भातशेतीचे उत्पन्न घेतात.

समुद्राच्या खाडीतून शेतात समुद्राचे पाणी जाऊ नये यासाठी भक्कम दरवाजे असलेली 'सात उघडी' आहे. मात्र, मागील चार वर्षात उधाणाच्या भरतीत होत असलेली मासेमारी यामुळे दरवाजे उध्वस्त होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली जात आहे.

या समस्येवर कोणताच तोडगा निघत नाही. शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा केला. मात्र, राजकीय श्रेयवादाच्या लढाईत हे संकट काही सुटलेच नाही. दुसरे याबाबत कोणतेही सोयरसुतक नसलेल्या खारभूमी सर्व्हेक्षण व अन्वेक्षण विभागाकडून शेतकऱ्यांच्या मागणीकडे नेहमीच दुर्लक्ष झाले आहे.

यावर्षी सुध्दा शेतकऱ्यांनी मोठया मेहनतीने शेती केली आहे. आर्थिक काटकसर करून कुटुंब चालविताना पीक उभे केले. आता भात कापून अडगवणी झाली, दोन दिवसात पीक घरी नेण्याची तयारी सुरू होती. त्यातच पिकावर पाणी शिरल्याने शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. संपूर्ण भात पाण्यात गेला आता काय करणार असा सवाल या शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. समुद्राच्या भरतीचे पाण्यांनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळावी अशी मागणी होत आहे.

चौक ग्रामपंचायत थेट सरपंचपदी रितू ठोंबरे यांची निवड

दै.रायगड नगरी । चौक

खालापुर तालुक्यातील चार ग्रुप ग्रामपंचायत सरपंच पदाच्या निवडणुकीबरोबर सार्वत्रिक निवडणुकी पार पडल्या यात शिवसेनेचे तीन ठिकाणी तर भाजपाने एका ठिकाणी विजय मिळवला असून चौक येथे शिवसेना विभाग प्रमुख सुधीर शेठ ठोंबरे यांच्या कन्या रितू ठोंबरे यांनी थेट सरपंच पदी तर लोधीवली येथे शिवसेनेच्या सरपंच पदी पूजा तवले, शिवसेना सरपंच बळीराम जांभळे, तर तुपगाव येथे भारतीय जनता पार्टीचे थेट सरपंच रवींद्र कुंभार यांनी बाजी मारली आहे.

यानिमित्ताने दि, ११ नोव्हेंबर २२रोजी सरपंच पदी विराजमान होण्यासाठी कार्यालयीन कागदपत्राची पूर्तता करून दुपारी २ वाजता चौक ग्रामपंचायत सरपंच पदी रितू ठोंबरे यांची तर उपसरपंच पदी राजेंद्र गावडे यांची निवड करण्यात आली.यावेळी चौक ग्रामपंचायतचे नवनिर्वाचित सदस्य सुभाष पवार, निखिल मालुसरे, अजिंक्य चौधरी, नैना झिंगे, मोनिका दबके , लक्ष्मीबाई वाघ, महादेव पिरकड,हातमोडे, सोनटक्के, राणे, तसेच इतर सदस्य व सर्व मतदारांनी त्यांचे जोर जोरात घोषणा देत जल्लोष करून स्वागत केले खालापूर नायब तहसीलदार कदम मॅडम, प्रशासक शैलेंद्र तांडेल. ग्रामसेवक एस. पी.जाधव व ग्रामपंचायतचे सर्व सभासदवृंद उपस्थित होते.



महाराष्ट्र शासन
महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)
Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167
निविदा सूचना क्रमांक ५१ सन २०२२-२०२३

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

अनु क्रमांक	कामाचे नांव	कामाची अंदाजित किंमत	इसारा / बयाणा रक्कम	ई-निविदा कोऱ्याची किंमत	काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून)	नोंदणी वर्ग
१	[illegible]	४२३७२८४	४३०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच व वरील
२	[illegible]	४१५६८०४	४२०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच व वरील
३	[illegible]	२२०५००१	२३०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
४	[illegible]	१७४२३६२	१८०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
५	[illegible]	१७३७९९५	१८०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
६	[illegible]	१६९१५४७	१७०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
७	[illegible]	१६४३८३६	१७०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
८	[illegible]	१६८२६८४	१७०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
९	[illegible]	१६४८८४४	१७०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
१०	[illegible]	१५७७७९९	१६०००	५९०/-	६ महिने	वर्ग पाच अ व वरील
११	[illegible]	१५४१०२४	१६०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
१२	[illegible]	१६४८८४४	१७०००	५९०/-	३ महिने	वर्ग पाच अ व वरील
१३	[illegible]	१२३७०००	१३०००	५९०/-	६ महिने	वर्ग सहा व वरील
१४	[illegible]	१७३३२६२	सु.बे.अ.	५९०/-	३ महिने	सु.बे.अ.

ई निविदेचे वेळापत्रक

१	निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ	दिनांक ११/११/२०२२(सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २५/११/२०२२रोजी १८.०० वाजेपर्यंत
२	ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास)	कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक २८/११/२०२२रोजी ११.०० वाजता

टिप:- परिपुर्ण निविदा https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पहाता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

जा.क्र.मंवि/लेखा/निविदा/४६२७
दिनांक : ०३/११/२०२२

(एस.आर.नामदे)
कार्यकारी अभियंता
महाड (सा.बां.) विभाग, महाड

क्र.आरओसी–२०२२–२३/क्र.५/सी ३९९१

अपघातग्रस्तांचे 'देवदूत' प्राण वाचवणार

आता पनवेल मनपाही करणार रेस्क्यू ऑपरेशन!

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दलाची क्षमता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. फायर ब्रिगेड सक्षम होत असून आता अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशन सुद्धा मनपाला करता येणार आहे. विशेष म्हणजे शीघ्र कृती व्हेईकल ताफ्यामध्ये सामील झालेली आहे. अपघातग्रस्तांचे प्राण वाचवण्यासाठी हे देवदूत वाहन वरदान ठरणार आहे.

सहा वर्षांपूर्वी पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली. त्याच कालावधीमध्ये नगरपरिषदेची फायर यंत्रणा मनपाकडे वर्ग करण्यात आली. तेव्हा मनपाकडे मनुष्यबळाबरोबरच यंत्रसामुग्री त्याचबरोबर बंब यांची कमतरता होती. त्यानंतर अग्निशमन दल सक्षम करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने पावले उचलली. कंत्राटी पद्धतीने फायरमन भरती करण्यात आली त्याचबरोबर सव्वाचार कोटी रुपये खर्च करून तीन वाहने खरेदी करण्यात आले. त्यामुळे साहजिकच अग्निशमन दलाची क्षमता बऱ्याच अंशी वाढली. पनवेल परिसरामधून महामार्ग जातात. त्याचबरोबर अंतर्गत रस्त्यांची संख्या सुद्धा मोठी आहे. या ठिकाणी वाहनांचे अपघात घडतात. त्याचबरोबर काही वाहनांना आग सुद्धा लागण्याची घटना घडते.

यावेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते. त्याप्रसंगी मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकडे यंत्रसामग्रीचा अभाव होता.

मात्र राज्य सरकारने मिनी रेस्क्यू व्हेईकल पनवेल महानगरपालिकेला दिली आहे. विशेष म्हणजे अग्निशमन दलाच्या ताब्यात हे वाहन दाखल झाले आहे. या वाहनाचा देवदूत असा नामोल्लेख केला जातो.

रेस्क्यू गाडीत तब्बल ८६ युकोपमेंट उपलब्ध असतील. त्यामध्ये ५०० लिटर पाण्याच्या टाकी आहे, स्टेपर, कटर, रॉड ,पुल्ली त्या सोबत लिफ्टिंग बॅग, बॅटरी ऑपरेट टूल्स,ब्रिथिग, ऑपरेटिव्ह सेट डी वॉटरिंग पम्प, मल्टी परपझ टूल्स, फर्स्ट मेडिकल किट, ऑपरेशन मेन्टनस टूल्स, रिमोट असे महत्व पूर्ण साहित्य या व्हेईकल उपलब्ध असतील. अपघातग्रस्तांना पत्रा कापून त्वरित बाहेर काढता येणे शक्य होईल. त्यामुळे अनेकांचा प्राण वाचू शकेल.

सुधागड-पाली परिसरात धुक्याची दाट चादर

दै.रायगड नगरी । सुधागड/पाली

सुधागडडासह पाली व परिसरात सर्वत्र रात्रीपासून धुक्याची दाट चादर पसरल्याने दिवस उगवल्यानंतरही काही अंतरावरील स्पष्टपणे दिसत नसल्याने वाकण–पाली–खोपोली सकाळच्या वेळी मार्गावरील वाहतुकीचा वेग मंदावला होता.

सुधागडासह पाली व परिसरात सर्वत्र रात्रीपासून धुक्याची दाट चादर पसरल्याने दिवस उगवल्यानंतरही काही अंतरावरील स्पष्टपणे दिसत नव्हते. मागील दोन तिन दिवसांपासून सुधागडासह परिसरात पहाटेच्या वेळी दव वर्षाव होत आहे. पावसाळा संपून थंडीची सुरुवात झाल्याची ही लक्षणे आहेत. आवकाळी पावसाने सुधागडात छोड उठवली होती. या वेळी बाराही महिने पाऊस पडते की काय अशी शक्यता निर्माण झाली होती.मात्र सुधागडासह परिसरात सध्या मात्र हवामानात बदल होऊन थंडी पडायला सुरुवात झाले. दिवसा हवामानात ऊष्मा जाणवत असली तरी सायंकाळनंतर वातावरणात गारवा येऊ लागला आहे. आज पहाटेपासून सर्वत्र धुके पसरल्याने काही मिटर अंतरावरील देखिल स्पष्ट दिसत नाही. वाहनचालक गाडीच्या लाईट तसेच इंडिकेटर दिवे लावून वाहने चालवत होते. पहाटे पायी चालण्याकरिता जाणार्यांकरिता धुक्याची ही चादर वेगळीच पर्वणी ठरली. धुकं ऐवढ दाट आहे की त्यामुळे सुर्यनारायणाचे दर्शन देखिल उशिरा झाले.

म्हसळ्यामध्ये १५ ते १९ नोव्हेंबर रोजी नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर

मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्यासाठी युवकांना आवाहन

दै.रायगड नगरी । कोर्लई

रायगड जिल्हाधिकारी तथा नियंत्रक नागरी संरक्षण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी संरक्षण रायगड यांच्यातर्फे दि.१५ नोव्हेंबर ते दि १९ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत म्हसळा येथील एस.टी. स्टँड घनसार हॉलमध्ये सकाळी ११.०० वाजता नागरी संरक्षण : आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उदघाटन तहसीलदार समीर घारे यांच्या शुभहस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

नागरी संरक्षण ही देशातील सामान्यलोकांची संघटना आणि प्रशिक्षण आहे जेणे करून सशस्त्र दल, वैद्यकीय सेवा किंवा पोलिस दलाला मदत करू शकतील, देशावर शत्रूने हल्ला केल्यास. नागरी संरक्षण उपाय तात्काळ आणीबाणीच्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी, जनतेचे संरक्षण करण्यासाठी आणि आपत्ती मुळे नष्ट झालेल्या किंवा नुकसान झालेल्या महत्त्वपूर्ण सेवाआणि सुविधा पुनर्संचयित करण्यासाठी डिझाइन केले आहे.

२४ ऑक्टोबर १९४१ रोजी भारतात सर्वप्रथम नागरी संरक्षणाची स्थापना करण्यात आली. संसदेने मे १९६८ रोजी नागरी संरक्षण कायदा २७,१९६८ म्हणून लागू केला.

नागरी संरक्षणाची उद्दिष्टे, जीव वाचवण्यासाठी, मालमत्तेचे नुकसान कमी करण्यासाठी, उत्पादनात सातत्य राखण्यासाठी, जनतेचे उच्च मनोबल राखणे, नागरी संरक्षणाच्या सेवा नागरी संरक्षणात १२ सेवा आहेत.यात मुख्यालय सेवा, संप्रेषण सेवा,वॉर्डन सेवा,अपघाती सेवा,अग्निशमन सेवा,प्रशिक्षण सेवा, बचाव सेवा,डेपो आणि वाहतूक सेवा, पुरवठा सेवा,बचाव सेवा यांचा यात समावेश आहे.

या पाच दिवसीय शिबीराबाबत अलिबाग येथील के.डी.पाटील,के.आर कुरकुटे (सउनि), शिरसाठ (सउनि), तुफैल दामाद यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. नागरी संरक्षण दलात भरती होण्यासाठी म्हसळा तालुक्यातील वय वर्षे १८ पूर्ण करणाऱ्या सर्व युवक युवती, सामाजिक संस्था, महाविद्यालये यांनी शिबिराचा लाभ घ्यावा.असे निमंत्रक डॉ.मुबश्शिर जमादार, किशोर मोहिते,अ.श.घनसार यांनी निमंत्रणाद्वारे कळविले असून नावनोंदणी व अधिक माहितीसाठी मुबश्शीर जमादार : मोबाईल नंबर ९४२३२४१७८४ व तुफैल दामाद : मो.नं. ९२७०५१२८५८ यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहन करण्यात आले आहे.